---

दंतवैद्य : काय हो कसा तुटला तुमचा दात?

बंडोपंत : बायकोने केलेली भाकरी खूपच कडक होती हो.

दंतवैद्य : मग, खायला नाही म्हणायचं ना.

बंडोपंत : मी तेच तर केलं!!

---

नवरा बायकोला घेऊन डॉक्टरकडे येतो.

डॉक्टरः बाई, हा थर्मामीटर पाच मिनिटं तोंडात धरुन ठेवा

पाच मिनिटं शांततेत गेल्यावर...

बाईचा नवराः डॉक्टर, काय किंमत आहे हो याची?

---

सर - सांगा बरं, तुमच्याकडे दहा नारळ आहेत आणि त्यातले सात खराब झाले. तर किती शिल्लक राहतील?

बंड्या - दहा

सर - ते कसं काय?

बंड्या - सर, खराब झालेले नारळसुद्धा नारळच राहतील. त्यांचा फणस तर होणार नाही.

---